शबरी आदिवासी घरकूल (शहरी) योजनेसाठी प्रकल्प कार्यालय सोलापूर अंतर्गत नगरपरिषद धाराशिव करीता सन २०२५-२६ या वर्षातील उद्दिष्ट ३४४ पैकी उर्वरीत २२९ घरकुलांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी निधी वितरीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आविवि-१०२६/प्र.क्र.५६ /का.०८ (ई-१८६१८९८)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२,
दिनांक : २३.१०.२०२६

वाचा :-

१. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आविवि-२०२३/प्र.क्र.३०/का.०८, दि.११.०१.२०२४
२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आविवि-०३२६/प्र.क्र.१५/का.०८, दि.३१.०३.२०२६
३. वित्त विभाग शासन परिपपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
४. अपर आयुक्त (मुख्यालय), आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचे पत्र क्र. विकास/(शबरी घरकुल)-२०२६-२७/प्र.क्र. /का ३(४) ७८२३, दि.०७.०९.२०२६
५. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांचे जा.क्र.शहरी घरकुल-२०२६/प्र.क्र./का-३(२)/२८३७ सोलापूर, दि.१५.१०.२०२६

प्रस्तावना :-

राज्यातील ज्या अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची घरे कुडा- मातीची आहेत किंवा अनुसूचित जमातीची जी कुटुंबे बेघर आहेत अशा अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना शहरी भागात शबरी आदिवासी घरकुल योजनेची अंमलबजावणी ही संबंधित महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत यांच्यामार्फत करण्यासाठी नगर विकास विभागाच्या सहमतीने आदिवासी विकास विभागाच्या दि.११.०१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर अंतर्गत धाराशिव नगरपरिषदेकरिता सन २०२५-२६ या वर्षात देण्यात आलेल्या ३४४ पैकी उर्वरीत २२९ घरकुलांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांच्याकडून प्राप्त मागणीनुसार एकूण रु.५,७०,१५,३८०/- (अक्षरी रूपये पाच कोटी सत्तर लाख पंधरा हजार तीनशे ऐंशी फक्त) इतक्या निधी मागणीचा प्रस्ताव अपर आयुक्त (मुख्यालय), आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्याकडून वाचा क्र. ४ येथील दि.०७.०९.२०२६ अन्वये प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर अंतर्गत धाराशिव नगरपरिषदेकरिता सन २०२५-२६ या वर्षात देण्यात आलेल्या ३४४ पैकी उर्वरीत २२९ घरकुलांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-५ मधील मुख्य लेखाशीर्ष, २२२५ - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण या मुख्य लेखाशिर्षाखाली शबरी आदिवासी घरकुल योजना (शहरी) (लेखाशीर्ष २२२५जी०३६) या योजनेच्या बाब क्र. ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) याखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत तरतुदीतून खालीलप्रमाणे निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. :-

अप्पर आयुक्त	प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र.	नगरपरिषद	उद्दिष्ट वर्ष	उद्दिष्ट	निधी वितरण (रुपये)	
					शा. नि. दि.३१.०३.२०२६	सदर शासन निर्णयाद्वारे
१	२	३	४	५	६	७
ठाणे	सोलापूर	धाराशीव	२०२५-२६	३४४	२,८९,८४,६२०/-	५,७०,१५,३८०/-
			एकूण वितरीत निधी (६+७)			८,५९,९९,३८०/-

२. उपरोक्त प्रमाणे रु.५,७०,१५,३८०/-(अक्षरी रूपये पाच कोटी सत्तर लाख पंधरा हजार तीनशे ऐंशी फक्त) इतका निधी अमंलबजावणी अधिकारी यांना वितरीत करण्यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे.

नियंत्रक अधिकारी यांनी वितरीत निधी सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी म्हणून संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण (BEAMS) प्रणालीवर तात्काळ वितरीत करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर तरतूद खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तीय नियम तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.३ येथील शासन परिपत्रकातील दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय कार्यालयाची राहील.

४. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रात केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. त्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशीर्षनिहाय/उपलेखाशीर्षनिहाय साध्य झालेल्या भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र इ. माहिती आदिवासी विकास विभागास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीतुन फक्त अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ मिळेल याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यालयाची राहील.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाने ई-ऑफिस नस्ती क्र.१८६१८९८ वरील टिप्पणी क्र.१४ वर दि. ०७.१०.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६१०२३१५५०४९१९२४ असा आहे. तसेच सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHHAYA NATHU MALI

Digitally signed by CHHAYA NATHU MALI
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tribal Development Department, 2.5.4.20=CD4E9F6041C76A9F3FD5CBCBC45AFFCE68BBD6F32230F05B4A2B54B875937776, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B20C807A33573110F6D8441C862B04F58811935279DCAD666C42A2FABC6C24E8, cn=CHHAYA NATHU MALI
Date: 2026.10.23 15:51:47 +05'30'

(छाया न. माळी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा.मंत्री (आदिवासी विकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
६. अपर आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, ठाणे
७. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर
८. नगरपरिषद, धाराशिव.
९. संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय
१०.महालेखापाल (लेखापरीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३.वित्त विभाग (कार्यासन-१९/ व्यय-१४), मंत्रालय, मुंबई-३२.
१४.कक्ष अधिकारी, कार्यासन-०६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवड नस्ती (का.८), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.